# मेट्रोत 'रचना'ची बाजी




सूरज कांबळे, कॉलेज क्लब रिपोर्टर
muntainbox@gmail.com

मुंबईमध्ये सध्या मेट्रोमार्गांची कामं जोरात सुरू आहेत. मुंबई मेट्रोतील (एमएमआरसी) स्थानक परिसराचं नियोजन करण्यासाठी नवनव्या संकल्पना आणल्या जाणार असून, त्यासाठी आर्किटेक्चर आणि अर्बन डिझाइनच्या विद्यार्थ्यांची मदत घेतली जातेय. त्यासाठी अलीकडेच आयोजित करण्यात आलेल्या एका स्पर्धेमध्ये रचना संसदच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली. कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या संघांनी यात प्रथम आणि तृतीय क्रमांक पटकावला. या दोन्ही संघांना ६० हजार आणि ३० हजार रुपयांचं पारितोषिक आणि प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात आलं.

मेट्रो - ३ वरील २७ स्थानकांपैकी कोणत्याही एका स्थानकासाठी 'स्टेशन एरिया मॅनेजमेन्ट आणि मल्टिमॉडल इंटिग्रेशन' करायचं होतं. यात स्कायवॉक, सबवे, बसस्थानक किंवा इतर कोणत्याही वाहतुकीच्या रूपात कनेक्टिव्हिटीची आखणी करणं आवश्यक होतं. स्पर्धेची घोषणा मार्चमध्ये झाली होती. दोन टप्प्यांत पार पडलेल्या या स्पर्धेमध्ये एकूण ५२ संघ सहभागी झाले होते. पहिल्या टप्प्यातून फक्त सोळा संघांची अंतिम फेरीसाठी निवड झाली. प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या संघामध्ये पार्थ बने, अनुश्री शेट्टी, वैष्णवी अय्यर, सुशांत निखर्गे, सुमित गवळी या विद्यार्थ्यांचा समावेश होता. तर तृतीय आलेल्या संघात सुचेतन सोनावणे, मानस केळुसकर, अमेय कोडलकर या तिघांचा समावेश होता.




## सिद्धीविनायक स्थानक

प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या संघाला प्रभादेवी येथील सिद्धीविनायक मेट्रो स्थानक देण्यात आलं होतं. या स्थानकासाठी ट्रान्झिटच्या इन्व्हर्टेड पिरॅमिडवर आधारित संकल्पना या विद्यार्थ्यांनी घेतली होती. त्यांनी पदपथ, सायकल ट्रॅक, सिद्धीविनायक मंदिराच्या मागील प्रवेशद्वारावर पादचारी मार्ग, गर्दीच्या वेळत चालणारे बसमार्ग यांचा समावेश करत डिझाइनच्या विविध कल्पना मांडल्या.

## वरळी स्थानक

तिसरा क्रमांक पटकावणाऱ्या संघाला वरळी मेट्रो स्थानक देण्यात आलं होतं. सास्मिरा संस्थेजवळ असलेल्या सिग्नलपासुन दूरदर्शनच्या सिग्नलपर्यंतच्या परिसराचा अभ्यास या संघानं केला. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, पदपथांचा वापर करण्यासाठी पादचारी मार्ग, त्यांचा वापर करण्यासाठी लोकांना प्रोत्साहित करणं हे त्यांचं मुख्य उद्दीष्ट होतं.

“

पाच महिने यासाठी आम्ही मेहनत केली होती. एमएमआरसीनं ही संधी आम्हाला उपलब्ध करून देत एक वेगळा अनुभव दिला आहे. त्यानिमित्तानं प्रशासनाबरोबर काम करण्याची चांगली संधी मिळाली.

**अनुश्री शेट्टी**, प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या संघाची प्रमुख



या स्पर्धेनं विद्यार्थ्यांना चांगला आत्मविश्वास दिला. मुंबई किंवा भारतात इतरत्र कुठेही अशा प्रकारे स्पर्धा राबवणं गरजेचं आहे. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेलं यश हे संपूर्णपणे त्यांचं आहे. त्यांच्या मेहनतीनेमुळे त्यांना हे बक्षीस मिळालं आहे.

**रोहित शिंकरे**, प्रिन्सिपल, आर्किटेक्चर, रचना संसद